MHBU130027872025

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | १४.११.२०२५ |
| नोंदणी दिनांक | : | १४.११.२०२५ |
| निकाल दिनांक | : | २०.०४.२०२६ |
| कालावधी | : | ५ महिने ६ दिवस |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चिखली, यांचे न्यायालयात.**

**(पीठासीन अधिकारी : आय.ए.वाय.ए. खान)**

**नि.फौजदारी खटला क्र. १७३७/२०२५**

**निशाणी क्रमांक ४७**

महाराष्ट्र शासन,
तर्फे : पोलीस स्टेशन अधिकारी,
पोलीस स्टेशन, बुलडाणा शहर,
ता. व जि. बुलडाणा. ..... **अभियोगपक्ष**

**- विरुध्द -**

१. राहुल सिध्दीविनायक बोंद्रे,
वय ५० वर्ष, धंदा - शेती,
२. लक्ष्मणराव जानुजी घुमरे,
वय ६० वर्ष, धंदा - शेती,
३. संजय भगवान राठोड,
वय ५२ वर्ष, धंदा - शेती,
४. संतोष विनायकराव आंबेकर,
वय ५९ वर्ष, धंदा - शेती,
५. दत्ता शंकर काकस,
वय ४७ वर्ष, धंदा - शेती,
६. एकनाथ पंढरी चव्हाण,
वय ४१ वर्ष, धंदा - शेती,
क्र. १ व २ रा. चिखली, ता. चिखली,
क्र. ३ ते ६ रा. बुलडाणा, ता. व जि. बुलडाणा .. **आरोपी**

**<u>गुन्हा</u>** :- भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १८८ आणि महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ चे कलम १३५ प्रमाणे.

---

अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. मो. बशीर
आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. व्ही.एन. नन्हई

---

## <u>न्या य नि र्ण य</u>
**(घोषीत दि. २०/०४/२०२६)**

आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १८८ आणि महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ चे कलम १३५ नुसार खटला चालवित येत आहे.

**<u>अभियोग पक्षाचे कथन</u> –**

२. फिर्यादी उमेश भास्कर घुबे पो.कॉ. यांनी बुलढाणा शहर पोलिस स्टेशन येथे फिर्याद दिली की, दि. ३१.०३.२०२४ रोजी दुपारी ३.५० वाजण्याचे दरम्यान आयकर विभागाने भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस कमिटीचे बॅंक खाते गोठवून १८०० कोटी रुपयाचा दंड ठोठावला त्याचे निषेधार्थ जयस्तंभ चौक, बुलडाणा येथे सर्व आरोपी व त्यांच्यासोबत १० ते १५ कॉंग्रेस पक्षाचे कार्यकर्ते हातामध्ये पक्षाचे झेंडे घेऊन होते. त्यावेळी 'बीजेपी सरकारचं करायचं काय खाली मुंडक वर

पाय, बीजेपी सरकारचा निषेध असो, जब जब मोदी डरता है ईडी को आगे करता है' अशा घोषणा करुन आंदोलने करीत होते. त्यावेळी आंदोलने, मोर्चा, निदर्शने, उपोषणे इत्यादी करण्यावर दि. ०६.०६.२०२४ पर्यंत निर्बंध असतानाही तसेच मा.जिल्हादंडाधिकारी साहेब यांचे आदेश क्रमांक गृहविभाग कक्ष ४–लो नि कावी/२५/२०२४ दि. १६.०३.२०२४ अन्वये फौजदारी प्रक्रीया संहीता १९७३ चे कलम १४४ नुसार सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय, संस्था, शासकिय विश्रामगृह, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्याच्या ठिकाणी धरणे, आंदोलने, मोर्चा इत्यादी दि. ०६.०६.२०२४ पावेतो निर्बंध असताना त्याचप्रमाणे मा. जिल्हादंडाधिकारी यांचे आदेश क्रमांक गृहविभाग कक्ष ४(२)/कावी/१०३/२०२४ दि. २६.०३.२०२४ अन्वये दि. २८.०३.२०२४ रोजीचे सकाळी ६.०० वाजता पासून ते दि. ११.०४.२०२३ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत बुलडाणा जिल्ह्यामध्ये मुंबई पोलिस कायदा असतानाही आरोपींनी दोन्ही आदेशाचे उल्लंघन करुन निदर्शने केली. त्यानंतर फिर्यादीने बुलडाणा शहर पोलिसस्टेशन येथे फिर्याद दाखल केली.

३. सदर फिर्यादवरुन आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १८८ आणि महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ चे कलम १३५ अन्वये गुन्हा

नोंद क्र. २६४/२०२४ दाखल झाला. तपासिक अंमलदार पो.उप.नि. रमेश कानडजे यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला. तपास टिपण नोंदवले. तपासाअंती आरोपींविरुद्ध वरील कलमान्वये न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १८८ आणि महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ चे कलम १३५ प्रमाणे दोषारोप निश्चित केले. आरोपींना सदर दोषारापातील मजकूर वाचून व समजावून सांगितला असता त्यांनी गुन्हा कबुल नसल्याचे सांगितले व संपरिक्षेची मागणी केली.

५. आरोपींविरुद्ध सबळ पुरावा दोषी ठेवण्याइतपत आल्याने फौजदारी प्रक्रिया संहीता कलम ३१३ अन्वये आरोपीचे निवेदन अनुक्रमे निशाणी क्रमांक ३५ ते ४० अन्वये नोंदविण्यात आले आहे.

६. माझ्या विचाराधीन उद्भवलेले मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे सिद्ध केले का की, दिनांक ३१/०३/२०२४ रोजी दुपारी ३.३० वाजण्याच्या सुमारास तुम्ही आरोपींनी आपआपसांत संगणमताने एका | |

| | | |
|---|---|---|
| | सार्वजनिक सेवकाने जारी केलेल्या आदेशानुसार आदेश जारी करण्याचा कायदेशीर अधिकार आहे, ज्यामध्ये तुम्हाला आदेश किंवा परवानगीशिवाय आंदोलन करु नये असे निर्देश देण्यात आले होते, परंतु तुम्ही अवज्ञा केली व त्याद्वारे भारतीय दंड संहिता कलम १८८ अन्वये गुन्हा केला ? | **नाही.** |
| २. | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, वरील दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवून समान उद्दीष्ट साधण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या जमावबंदी आदेशाचा भंग केला व त्यायोगे महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ चे कलम १३५ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | **नाही**. |
| ३. | आदेश काय ? | **आरोपी यांना निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

७. सरकारी अभियोक्ता मो.बशीर मो.नसीर व आरोपीतर्फे वकील श्री. व्ही.एन. नन्हई यांचा युक्तीवाद ऐकला. अभियोग पक्षातर्फे दाखल केलेली कागदपत्रे तपासली.

८. अभियोग पक्षाने एकुण ४ साक्षीदार तपासले त्यामध्ये सा.क्र. १ फिर्यादी उमेश भास्कर घुबे यास नि.क्र. २४ वर, सा.क्र. २ संजय महादेव अहीर यास नि.क्र. २५ वर, सा.क्र. ३ निलेश सुरेश लोधी यास नि.क्र. ३० वर, सा.क्र. ४ रमेश पांडुरंग कानळजे यास नि.क्र. ३२ वर तपासले.

९. अभियोग पक्षाने आरोपीवर भारतीय दंड विधान कलम १८८ व कलम ३७(१)(३) सह कलम १३५ महाराष्ट्र पोलिस अधिनियम खालील गुन्हा सिध्द करणे गरजेचे आहे. त्या अनुषंघाने मी सदर कलम पुराव्याचे पुनरुच्चारण करणेकामी खालील प्रमाणे पुनरुच्चीत करीत आहे.

**<u>Section 188 Disobedience to order duly promulgated by public servant</u>**

Whoever, knowing that, by an order promulgated by a public servant lawfully empowered to promulgate such order, he is directed to abstain from a certain act, or to take certain order with certain property in his possession or under his management disobeys such direction, shall, if such disobedience causes or tends to cause obstruction, annoyance or injury, or risk of obstruction, annoyance or injury, to any persons lawfully employed, be punished with simple imprisonment for a term which may extend to one month or with fine which may extend to two hundred rupees, or with both; And if such disobedience causes or tends to cause danger to human life, health or safety, or causes or tends to cause a riot or affray, shall be punished with imprisonment of either description for a term which may extend to six months, or."

“Section 135 makes it an offense to disobey or fail to comply with orders, directions, or notifications issued by the State Government or a police officer under Section 37 of the Act.”

“The offense is considered cognizable if the conditions set by the law are met, allowing a police officer to arrest without a warrant and start prosecution. If these conditions are not met, it becomes a non-cognizable offense.”

"या कलमाचा वापर सार्वजनिक सुव्यवस्थेसाठी लागू केलेले नियम आणि कायदे लागू करण्यासाठी केला जातो, जसे की वाहतूक, सभा किंवा कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक असलेल्या इतर क्रियाकलापांवर निर्बंध."

**<u>मुद्दा क्र.१ व २ बाबत</u>** :–

१०. मुद्दा क्र. १ व २ हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे पुराव्यावरील विश्लेषणाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मी त्यावर एकत्रितपणे चर्चा करीत आहे.

११. अभियोगपक्षाच्या वतीने आरोपीवर कलम १८८ भादवी, कलम १३५ महाराष्ट्र पोलिस अधिनियम नुसार गुन्हा सिध्द करणेकामी एकुण चार साक्षीदार तपासले. सा.क्र. १ उमेश भास्कर घुबे नि.क्र. २४ वर तपासले. त्याने सरतपासात कथन केले की, घटनेच्यावेळी तो बुलडाणा पोलिसस्टेशन येथे गोपनिय

विभागामध्ये पोलीस कॉन्स्टेबल म्हणून कर्तव्यावर होता. सदर दिवशी केंद्र सरकारच्या आयकर विभागाने भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस कमीटीचे बँक खाते गोठविले आहे त्याच्या निषेधार्थ भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे काही कार्यकर्ते हे जयस्तंभ चौक येथे आंदोलन करण्यासाठी जमा झाले आहेत अशी त्याला माहिती मिळाली. त्यानंतर सदर दिवशी तो व त्याच्यासोबत स.पो.नि. लोधी असे दुपारी ३.३० वाजता जयस्तंभ चौक येथे गेले तेव्हा त्या ठिकाणी निषेध आंदोलनाकरीता राहुल बोंद्रे, संजय राठोड, दत्ता काकस, लक्ष्मण घुमरे, संतोष आंबेकर, समाधान तुपकर असे अंदाजे १० ते ११ लोक हजर होते. सदर ठिकाणी ते 'बिजेपी सरकारचे करायचे काय खाली मुंडकं वर पाय, जब जब मोदी डरता है इडी को आगे करता है' अशा घोषणाबाजी करुन सार्वजनिक ठिकाणी आंदोलन केले. मा. जिल्हाधिकारी साहेबांचा जमावबंदी आदेश असतानासुध्दा कोणतीही परवानगी न घेता आरोपींनी आंदोलन केले. त्यानंतर त्याने पोलिसस्टेशनला फिर्याद दिली. सदरच्या फिर्यादला नि.क्र. २५ व छापील फिर्यादला नि.क्र. २६ देण्यात आले.

१२. उलटतपासात त्याने मान्य केले की, घटनास्थळ हे वर्दळीचे व रहदारीचे ठिकाण आहे. घटनास्थळाच्या आजुबाजूच्या लोकांची तोंडी किंवा लेखी तक्रार त्याच्याकडे आली नाही. त्याला सर्व आरोपींचे नाव माहीत नाही. जिल्हाधिकारी साहेबांचा जमावबंदीच्या आदेशाची प्रत व्यापक प्रमाणात प्रसिध्द

झाल्याचे त्याने बघीतले नाही. त्याने उलटतपासात मान्य केले की, घटना घडली त्यावेळी महाराष्ट्र राज्यात व केंद्रात भाजपाचे सरकार होते. तसेच नमुद आरोपी हे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे आहेत. त्याने घटना घडल्यानंतर सदर केसची एफ.आय.आर. चार तास उशीराने दाखल केली.

१३. अभियोग पक्षाने सा.क्र. २ संदिप महादेव अहीर यास नि.क्र. २५ वर तपासले. तो घटनास्थळ पंच आहे. त्याने सरतपासात कथन केले की, पोलिसाने दि. ०१.०४.२०२४ रोजी घटनास्थळ पंचनामा करणेकामी बोलाविले नव्हते. घटनास्थळ पंचनाम्यावर त्याची सही नाही. त्याच्या देखत जयस्तंभ चौक, बुलडाणा येथे कोणताही पंचनामा झाला नाही. सदर साक्षीदाराला फितुर घोषीत करण्यात आले. अभियोग पक्षातर्फे उलटतपासात अभियोग पक्षाला सहकार्य होईल असे कोणतेही उत्तर दिले नाही. त्यामुळे त्याच्या साक्षीला कायदेशीर महत्व देता येत नाही.

१४. अभियोग पक्षाने सा.क्र. ३ निलेश सुरेश लोधी याला नि.क्र. ३० वर तपासले. सदर साक्षीदाराने सरतपासात कथन केले की, घटनेच्यावेळी तो बुलडाणा पोलिसस्टेशन येथे सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक म्हणुन कर्तव्यावर होता. सदर दिवशी केंद्र सरकारच्या आयकर विभागाने भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस कमीटीचे बँक

खाते गोठवुन १८०० कोटी रुपयांचा दंड थोटावला त्याच्या निषेधार्थ भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे काही कार्यकर्ते हे जयस्तंभ चौक येथे आंदोलन करण्यासाठी जमा झाले आहेत अशी माहिती मिळाली. त्यानंतर सदर दिवशी तो व त्याच्यासोबत स.पो.नि. लोधी असे दुपारी ३.३० वाजता जयस्तंभ चौक येथे गेले तेव्हा त्या ठिकाणी निषेध आंदोलनाकरीता राहुल बोंद्रे, संजय राठोड, दत्ता काकस, लक्ष्मण घुमरे, संतोष आंबेकर, समाधान तुपकर असे अंदाजे १० ते १५ लोक हजर होते. सदर ठिकाणी आरोपींनी हातामध्ये कॉंग्रेस पक्षाचे झेंडे घेऊन व दंडावर काळी पट्टी लावुन भाजपा सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करीत होते तसेच 'बिजेपी सरकारचे करायचे काय खाली मुंडकं वर पाय, जब जब मोदी डरता है इडी को आगे करता है' अशा घोषणाबाजी करुन सार्वजनिक ठिकाणी आंदोलन केले. मा. जिल्हाधिकारी साहेबांचा जमावबंदी आदेश असतानासुध्दा कोणतीही परवानगी न घेता आरोपींनी आंदोलन केले.

१५. उलटतपासात त्याने मान्य केले की, घटनास्थळ हे वर्दळीचे ठिकाण आहे त्याठिकाणी नेहमी गर्दी असते. घटनास्थळाच्या आजुबाजूच्या लोकांची तोंडी किंवा लेखी तक्रार त्याच्याकडे आली नाही. त्याला सर्व आरोपींचे नाव माहीत नाही. त्याने जिल्हाधिकारी साहेबांचा जमावबंदीच्या आदेशाची प्रत व्यापक प्रमाणात प्रसिध्द झाल्याचे बघीतले होते. त्याने उलटतपासात मान्य केले की, घटना घडली त्यावेळी महाराष्ट्र राज्यात व केंद्रात भाजपाचे सरकार होते.

तसेच नमुद आरोपी हे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे आहेत.

१६. अभियोग पक्षाने सा.क्र. ४ रमेश पांडुरंग कानळजे याला सा.क्र. ३२ वर तपासले. सदर साक्षीदार तपासीक अधिकारी आहे. त्याने त्याच्या सरतपासात कथन केले की, तो फिर्यादी पो.कॉ. उमेश घुबे याला ओळखतो. तो दि. ३१.०३.२०२४ रोजी बुलडाणा पोलिसस्टेशन येथे पी.एस.आय म्हणून कर्तव्यावर होता. सदर गुन्हयाचा तपास त्याला मिळाला. तपास कामी त्याला फिर्याद प्रथम खबर अहवालाची प्रत मिळाली त्याने दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा केला घटनास्थळ पंचनाम्यातील मजकुर त्याने ओळखला त्यास नि.क्र. ३३ देण्यात आले. साक्षीदारांचे जबाब नोंदविले जिल्हाधिकारी बुलडाणा यांचे जमाव बंदीचे आदेशाची प्रमाणीत प्रत दाखल करण्यात आली.

१७. उलटतपासात त्याने मान्य केले की, त्याने तपास करीत असताना एफ.आय.आर. चे अवलोकन केले होते. सदर घटनेचया एफ.आय.आर चार तास उशीराने दाखल झाला होता. पोलिसांव्यतिरीक्त इतर इसमांना साक्षीदार म्हणून तपासले नाही. तो सर्व आरोपींना ओळखत नाही. त्याने उलटतपासात मान्य केले की, सदर प्रकरणातील आरोपी हे कॉंग्रेस पक्षाचे आहेत. सन २०२४ मध्ये महाराष्ट्र राज्यामध्ये भाजपाचे सरकार होते.

१८. वरील पुराव्याचे व कायद्याचे एकंदरीत अवलोकन करता असे दिसून येते की, आरोपींविरुध्द फिर्याद देण्यात आली की, फिर्यादी उमेश घुबे पोलिस साक्षीदार, यास माहिती मिळाली की, कॉंग्रेस पक्षाचे कार्यकर्ते जयस्तंभ चौक बुलडाणा येथे केंद्र सरकारच्या आयकर विभागाने कॉंग्रेस पक्षाचे खाते गोठवून १८०० कोटी रुपयांचा दंड ठोठावला. त्याचे निषेधार्थ आरोपींनी आंदोलन करणार होते. सदर दिवशी ०३.५० मिनीटांनी जयस्तंभ चौक येथे सर्व एकूण ११ आरोपीं व्यतिरीक्त १० ते १५ कॉंग्रेस पक्षाचे कार्यकर्ते हातामध्ये त्यांचे पक्षाचे झेंडे घेऊन हाताचे दंडावर काळी फित बांधली व 'बीजेपी सरकारचा निषेध होवो' व इतर घोषणाबाजी केली. परंतु, तपासीक अमलदाराने सदर केंद्र सरकारच्या आयकर विभागाने कॉंग्रेस पक्षाचे खाते गोठवून १८०० कोटी रुपयाचा दंड लावल्याची कागदोपत्री प्रत अभिलेखावर दाखल केली नाही. तसेच आरोपीच्या हातात असलेले फलक व हातावर लावलेली फित आरोपीकरुन हस्तगत करण्यात आली नाही व अभिलेखावर दाखल करण्यात आली नाही. सदर एकूण ११ आरोपींपैकी इतर १० ते १५ आरोपी घटनेच्यावेळी हजर होते. परंतु, सदर इसमांपैकी एकालाही आरोपी करण्यात आले नाही. ठराविक एकूण ११ व्यक्तींना प्रस्तुतच्या खटल्यात आरोपी करण्यात आले. अभियोग पक्षातर्फे केवळ ६ साक्षीदार तपासण्यात आले त्यापैकी घटनास्थळ पंच संजय अहीर याने अभियोग

पक्षाला सहकार्य केले नाही त्यामुळे त्याला फितुर घोषीत करण्यात आले व त्यामुळे त्याच्या साक्षीला कायदेशीर महत्व देता येत नाही. इतर ३ साक्षीदार पोलीस साक्षीदार आहेत. त्यामुळे कोणत्याही स्वतंत्र साक्षीदार आरोपीचा गुन्हा सिध्द करणेकामी तपासण्यात आले नाही. सदर तीनही साक्षीदारांनी उलटतपासात मान्य केले की, घटनास्थळ जयस्तंभ चौक हे वर्दळीचे ठिकाण आहे. परंतु, तेथील सीसीटीव्ही असल्यास ती बघण्यात आली नाही व अभिलेखावर दाखल करण्यात आली नाही. हे सर्वस्व मान्य आहे की, घटनेच्या वेळी सदर तीनही साक्षीदार यांनी घटनेच्या वेळी हजर होते त्यामुळे येथे प्रश्न उद्भवतो की, या आधुनिक काळात तीघेही पोलिस साक्षीदारांनी त्यांचे मोबाईलमध्ये व्हीडीओ किंवा चित्रीकरण का घेतले नाही व पुरावा म्हणून अभिलेखावर का दाखल केले नाही. त्यामुळे अभियोग पक्षाच्या कहाणीवर शंका निर्माण होते. फिर्याद एकूण ४ तास उशीराने दाखल करण्यात आली. उशीराचे स्पष्टीकरण देण्यात आले नाही. सदर तीनही पोलीस साक्षीदारांची साक्ष बघीतल्यावरुन असे दिसून येते की, आरोपींनी त्यांचे कर्तव्यात कोणत्या आरोपींनी कधी अडथळा निर्माण केला असे त्यांनी आरोपींविरुध्द असे कथन केले नाही. आरोपींना कलम १४८ सीआरपीसी ची नोटीस देण्यात आली नाही. सबब अभियोग पक्षातर्फे कलम १८८ भादवी सिध्द करण्यात आली नाही.

१९. सा.क्र. ४ रमेश पांडुरंग कानळजे तपासीक अमलदार याने उलटतपासात मान्य केले की, आरोपी कॉंग्रेस पक्षाचे आहेत व घटनेच्या वेळी भाजपा पक्षाचे सरकार होते. त्यामुळे वरील पुराव्याचे अवलोकन करता असे दिसून येते की, आरोपींविरुध्द फिर्याद केवळ राजकीय दबावावरुन देण्यात आली. भारतीय दंड संहितेच्या (IPC) कलम १८८ नविन कलम २२३ बी.एन.एस. नुसार, सार्वजनिक सेवकाने (उदा. पोलीस, सरकारी अधिकारी) जारी केलेल्या कायदेशीर आदेशाची अवज्ञा केल्यास शिक्षा होते. या गुन्ह्यासाठी शिक्षा आदेशाचे पालन न केल्यामुळे मानवी जीव, आरोग्य किंवा सुरक्षिततेस किती धोका निर्माण झाला आहे यावर अवलंबून असते.

२०. जेव्हा एखादी व्यक्ती सार्वजनिक सेवकाने जारी केलेला, ज्याचे पालन करणे कायदेशीररीत्या बंधनकारक आहे असा आदेश जाणूनबुजून मोडते, तेव्हा ती व्यक्ती कलम १८८ अंतर्गत गुन्हा करते. या गुन्ह्याचा उद्देश सार्वजनिक सेवकाने जारी केलेल्या आदेशाचे उल्लंघन करणे हा असतो. परंतु कोणत्या अधिका–याने कशाचे पालन करणे होते याचा पुरावा अभिलेखावर दाखल करण्यात आला नाही.

२१. अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द जिल्हाधिकारी बुलडाणा यांच्या महाराष्ट्र पोलिस कायदयाचे कलम ३७(१)(३) च्या आदेशाचा भंग केल्याचे आरोप आहे परंतु त्या आदेशाची प्रत दोषारोत्रामध्ये दाखल नाही. अशा परिस्थीतीत सदरील आदेश जारी होता किंवा नाही याचा पुरावा प्रकरणात उपलब्ध नाही. त्यामुळे माझे असे मत आहे की, अभियोग पक्षाने कलम २२३ बी.एन.एस. जुने कलम १८८ भादवी प्रमाणे आरोपींवर गुन्हा सिध्द केला नाही. तसेच कलम १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम सिध्द केले नाही. सबब, मी मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ०३ करिता.</u>**

२२. प्रस्तुत प्रकरणामध्ये कलम १८८ भा.द.वी. व महाराष्ट्र पोलीस कायद्याचे कलम (१)(३), १३५ अधिनियम १९५१ अन्वये दोषारोप आरोपींविरुध्द संशयापलीकडे सिध्द झालेला नाही. त्यामुळे सर्व आरोपी निर्दोष म्हणुन मुक्त करण्यास पात्र आहेत. सबब, मुद्दा क्र. ३ च्या अनुषंगाने खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

१) आरोपी क्र.१ राहुल सिध्दीविनायक बोंद्रे, आरोपी क्र.२ लक्ष्मणराव जानुजी घुमरे, आरोपी क्र.३ संजय भगवान राठोड, आरोपी क्र.४ संतोष विनायकराव आंबेकर, आरोपी क्र.५ दत्ता शंकर काकस, आरोपी क्र.६ एकनाथ पंढरी चव्हाण यांना भारतीय दंड संहिता, १८६०, चे कलम १८८ आणि महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ चे कलम १३५ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या अपराधांतुन फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम २५५(१) नुसार निर्दोष मुक्त करण्यांत येत आहेत.

२) आरोपीचे बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येते.

३) आरोपींनी कलम ४३६(अ) फौजदारी प्रक्रिया संहिते प्रमाणे रु. ६,०००/- ची जमानत द्यावी.

**(न्यायनिर्णय खुले न्यायालयात जाहीर करण्यात आला.)**

Digitally signed by IRFANALIKHAN YOUSUF ALI KHAN
Date: 2026.04.20 18:21:33 +0530

**(आय.ए.वाय.ए. खान)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
चिखली.

ठिकाणः चिखली
दिनांकः- २०.०४.२०२६.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | G.V. Nimje<br>Stenographer Grade III |
| Court | : | C.J.J.D. & J.M.F.C., Chikhli. |
| Date | : | 20/04/2026 |
| Signed by P. O. on | : | 20/04/2026 |
| Uploaded on | : | 20/04/2026 |